महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ २८ डिसेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १८२ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## ठाण्यात युतीचा तिढा कायम



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका निवडणुकीत युती करण्यासाठी भाजप आणि शिवसेना (शिंदे गट) या दोन्ही पक्षांच्या नेत्यांमध्ये तिसरी बैठक पार पडली. मात्र, या बैठकीत तीन प्रभागातील १२ जागांच्या वाटपावर दोन्ही पक्षांच्या नेत्यांचे एकमत होऊ शकले नाही. यामुळे युतीचा तिढा अद्यापही कायम आहे. दरम्यान, तीन प्रभागातील जागा वाटपांचा तिढा लवकरच सुटेल आणि युती होईल, असा दावा दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना दिला.

शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यात युतीबाबत आतापर्यंत दोन बैठका पार पडल्या आहेत. मात्र या बैठकीतून अद्याप कोणताही ठोस तोडगा निघालेला नव्हता. यानंतर स्थानिक नेत्यांमधील संवाद थांबला होता. भाजपचे आमदार संजय केळकर यांनी शनिवारपर्यंत युतीबाबत निर्णय घेण्याची मुदत शिवसेना (शिंदे गट) पक्षाच्या नेत्यांना दिला होता. दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी शुक्रवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाण्यातील शुभदीप निवासस्थानी भेट घेतली. या भेटीत ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि नवी मुंबई महापालिकांमधील जागा वाटपाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आल्याची माहिती राजकीय सूत्रांनी दिली. या भेटीनंतर शनिवारी दुपारी स्थानिक पातळीवरील नेत्यांची बैठक पार पडली. शिवसेना (शिंदे गट) पक्षाकडून खासदार नरेश म्हस्के, माजी आमदार रविंद्र फाटक, राम रपाळे, महिला जिल्हाप्रमुख मीनाक्षी शिंदे तर, भाजपकडून आमदार निरंजन डावखरे, जिल्हाध्यक्ष संदीप लेले, माधवी नाईक हे उपस्थित होते. तीन तास झालेल्या बैठकीत तीन प्रभागातील १२ जागांच्या वाटपावर दोन्ही पक्षांच्या नेत्यांचे एकमत होऊ शकले नसून यावर आता वरिष्ठ नेते निर्णय घेणार आहेत. यामुळे युतीचा तिढा अद्यापही कायम आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी युती झालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका मांडली असून, युतीसंदर्भात आतापर्यंत तीन बैठका पार पडल्या आहेत. या बैठकींमधील चर्चा सकारात्मक झाली. तीन प्रभागांतील काही जागांबाबत सध्या उलटसुलट मतप्रवाह असले तरी, वरिष्ठ नेत्यांच्या अंतिम बैठकीत त्यावर निर्णय होईल. दोन्ही पक्ष एकमेकांना विश्वासात घेऊनच त्यावर अंतिम निर्णय घेतील आणि लवकरच होऊन युतीची अधिकृत घोषणा केली जाईल, असे खासदार नरेश म्हस्के यांनी सांगितले. तर युतीच्या बैठकीत दोन्ही पक्षानी आपले प्रस्ताव ठेवून चर्चा केली. तीन प्रभागातील जागांबाबत वेगवेगळे मतप्रवाह असून त्यावर वरिष्ठ निर्णय घेतील, असे भाजपचे ठाणे जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांनी सांगितले.

## कल्याण डोंबिवलीत युती होणारच

### ठाकरे आणि मनसे युतीचा फॉर्म्युला ठरला




**आगामी महापालिका निवडणुकीत मोठे बदल होताना दिसत आहेत. राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र आले असून त्यांनी युतीची घोषणा केली. मनसे आणि शिवसेना ठाकरे गट राज्यातील महापालिका निवडणुका एकत्र लढवणार आहेत.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गट आणि मनसे यांच्यातील जागावाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. दोन्ही पक्ष एकत्रितपणे निवडणूक लढवणार असून 122 जागांपैकी 54 जागांवर मनसे तर 68 जागांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आपले उमेदवार उभे करणार आहे. या संदर्भात बोलताना ठाकरे गटाच्या जिल्हाप्रमुखांनी सांगितले की, कल्याणमधील राजकीय परिस्थिती लक्षात घेता मनसे आणि ठाकरे गट एकत्र लढण्याचा निर्णय घेतला आहे. वाटाघाटी अत्यंत सकारात्मक पद्धतीने पूर्ण झाल्या आहेत. दोन्ही ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर कार्यकर्त्यांमध्येही मनोमिलन झाले असून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करून बैठकीची सुरुवात करण्यात आली.

मनसेकडून ज्या जागांची मागणी करण्यात आली होती, त्या जागा शिवसेनेच्या वतीने सोडण्यात आल्या असून काही जागांबाबत ठाकरे गटानेही आग्रह धरला, त्या जागा मनसेने सोडल्याचे सांगण्यात आले. मनसे नेते राजू पाटील यांनी 122 पैकी 54 जागांची मागणी केली होती. त्यामध्ये कल्याण पश्चिमेतील 12 ते 13 जागांवर मनसे उमेदवार रिंगणात असतील, तर उर्वरित जागांवर ठाकरे गट आपले उमेदवार उभे करणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस किंवा इतर कोणताही पक्ष चर्चेसाठी पुढे आला तर त्यांच्याशी चर्चा करण्याची तयारीही ठेवण्यात आली आहे. मात्र, सध्या कोणत्याही पक्षासोबत अधिकृत चर्चा झालेली नसल्याचे स्पष्ट करण्यात आले. यावेळी महायुतीवरही जोरदार टीका करण्यात आली. भाजप-शिवसेना महायुती ही स्वतःच्या ओझ्याने पडणार असल्याचा दावा करत, पक्षात मोठ्या प्रमाणावर इन्कमिंग केलेल्या लोकांना कसा न्याय दिला जाणार, हे महाराष्ट्र पाहील, असा टोला लगावण्यात आला.

महानगरपालिकेत जास्तीत जास्त जागा मिळवणे हे उद्दिष्ट असून, युतीच्या पॅनेलमध्ये सक्षम उमेदवार मिळाल्यास त्यांना संधी देण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. शंभर टक्के जागावाटप पूर्ण झाले असून दोन्ही पक्षांनी निवडणुकीच्या तयारीला सुरुवात केली असल्याचे नेत्यांनी सांगितले आहे. आता कल्याण डोंबिवलीत शिवसेना शिंदे गट, भाजपा आणि अजित पवारांच्या NCP मध्ये युती होते का? हे पाहण्यासारखे ठरणार आहे.

## लोकशाही राज्यात दोन प्रकारच्या लढाया यापुढे हिंदूंना लढायच्या आहेत - शरद पोंक्षे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**कल्याण** : लोकशाही राज्यामध्ये दोन प्रकारच्या लढाया यापुढे हिंदूंना लढायच्या आहेत. मतदान करताना मनात एक वाक्य करून ठेवायचं आहे, हिंदू हित की, बात करेगा वही देश पे राज करेगा. हिंदूंचे कमीत कमी नुकसान करणाऱ्याला मत द्या. तीन माणसांचं घर ज्यांना चालवता येत नाही त्यांनी १४० करोडचा देश चालवणाऱ्याला शिकवू नये, ही झाली पहिली लढाई. हलालच्या वस्तू वापरू नका. जाळीच्या गोल टोपीवाल्याकडून काही खरेदी करू नका, आर्थिक नाका बंदी करा. दोन्ही लढाया गुप्तपणे संविधानाने दिलेल्या अधिकारात लढायच्या आहेत. हिंदू राष्ट्र बनविण्यासाठी सर्वसामान्य माणसांना कुठल्या लढाया जिंकायच्या ते मी तुम्हाला सांगितलं आहे. असे परखड मत ज्येष्ठ अभिनेते शरद पोंक्षे यांनी कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात"अखिल भारतीय ब्राह्मण महासंघाच्या "कार्यक्रमात व्यक्त केले. अखिल भारतीय ब्राह्मण महासंघ कल्याण यांनी अत्रे रंगमंदिर येथे नाशिकच्या सोनाली करंदीकर अकादमीच्या कलाकारांचा संभवामी युगे युगे हा नृत्याविष्कार व शरद पोंक्षे यांचे कर्म, धर्म, कर्तव्यातले हिंदुत्व या विषयावरील व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. यावेळी परशुराम आर्थिक विकास मंडळाचे अध्यक्ष कॅप्टन आशिष दामले, राष्ट्रीय अध्यक्ष गोविंदराव कुलकर्णी, अमित धाक्रस, महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष निखिल लातुरकर, राष्ट्रीय उपाध्यक्ष जोशी, प्रदेश सरचिटणीस शशांक खेर यांच्या उपस्थितीत श्री गणेश वंदन, परशुराम, श्रीराम नटराज पुजन होऊन दीपप्रज्वलन करण्यात आले. अमोल जोशी गुरुजी व इतर ब्रम्हवृंदानांच्या मंत्रोच्चारात कार्यक्रमाची सुरवात झाली. संस्थेच्या सामाजिक कार्यक्रमासाठी लागणारा निधी निर्माण करण्यासाठी काही तरी मोठा कार्यक्रम आयोजित करुन त्यातुन जमा होणारा निधी, समाजातील गरीब गरजु विद्यार्थी, वैदयकीय मदतीसाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. धर्म म्हणजे काय हे सोप्या शब्दात समजावून सांगून सर्वांनी आपल्या धर्माच्या रक्षणासाठी जागृत का असलं पाहिजे व सर्वसामान्य माणूस आपल्या कृतीतून ते सहजरित्या कसं करू शकतो हे त्यांनी समजावून सांगितले.

## अडीच वर्ष केलेलं काम जनता विसरणार नाही

### ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांचे एकनाथ शिंदेंबाबत कौतुकोद्गार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



**ठाणे** : अडीच वर्ष महाराष्ट्रात जातीयवादाचा वणवा पेटलेला असताना तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तो कुशलतेने हाताळला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून हजारो रुग्णांना रोगमुक्त करण्याचे काम शिंदे यांनी कोणताही गाजावाजा न करता शांततेत केले. हा त्यांचा मोठेपणा आहे. शिंदे यांनी केलेलं काम लोक विसरणार नाहीत, अशा शब्दांत ज्येष्ठ नेते प्रकाश महाजन यांनी शिवसेना मुख्य नेते व उपमुख्यमंत्री शिंदे यांचे कौतुक केले. हिंदुत्वाविषयी जागरुक असलेले शिंदे कडवे हिंदुत्ववादी नेते आहेत, असे महाजन म्हणाले. ठाणे येथे उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या उपस्थितीत महाजन यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला.

महाजन पुढे म्हणाले की, हिंदुत्वावर काम करण्याची इच्छा असल्याने आज शिवसेनेत प्रवेश केला. महाराष्ट्रात अनेक मुख्यमंत्री झाले जे घरात बसून राहिले, परीक्षेला बसले नाहीत पण पहिले आले, मात्र एकनाथ शिंदे याला अपवाद ठरले. ते परीक्षेला पण बसले आणि पहिले आले, अशा शब्दांत महाजन यांनी शिंदे यांच्या मुख्यमंत्रीपदाचे कौतुक केले. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून बरे झालेल्या रुग्णांनी शिंदे यांना आभार पत्रं पाठवली, त्या पत्रांच वजन १०० किलो आहे, असं दृश्य आजवर कुठल्याही मुख्यमंत्र्यांनी महाराष्ट्राला दाखवलं नाही. मात्र याचा कुठेही शिंदे यांनी गाजावाजा केला नाही हा त्यांचा मोठेपणा आहे, असे महाजन म्हणाले. शिंदे यांच्या अडीच वर्षाच्या कारकिर्दीबाबत ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही कौतुक केले आहे, असे ते म्हणाले.

### शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत केला प्रवेश

शिवसेनेचे प्रमुख असूनही शिंदे स्वतःला नेता समजतात हा त्यांचा मोठेपणा आहे. काल रात्री साडेबारा वाजता एक मराठी माणूस दुसऱ्या मराठी माणसाला भेटतो हे महाराष्ट्रासाठी नवीन आहे. शिवसेना पक्ष प्रवेशासाठी मंगेश चिवटे यांचे महाजन यांनी यावेळी आभार मानले.

महापालिकांच्या निवडणुकांसाठी शिवसेना आणि भाजपमध्ये सन्मानजनक युती होईल.एक ते दोन दिवसांत अंतिम स्वरुप दिलं जाईल, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. युती झाली पाहिजे असे स्पष्ट आदेश मुख्यमंत्री फडवणीस यांचे आहेत. ते प्रत्येक महापालिकेचा आढावा घेत आहेत, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले. शिवसेना आणि भाजपा विचारांची युती आहे. केंद्रात एनडीए सरकार आणि महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आहे. बाळासाहेबांची विचारधारा पुढे घेऊन जाण्याचे काम शिवसेना करत आहेत. काहीजण स्वार्थासाठी, सत्तेसाठी आणि अस्तित्व टिकवण्यासाठी युती करत आहेत, असा टोला उपमुख्यमंत्री शिंदे यांनी उबाठा मनसे युतीवर लगावला. आगामी महापालिका निवडणुकीत बाळासाहेबांचे विचार आणि विकासाचा अजेंडा घेऊन लोकांसमोर जातोय. यात महायुती प्रचंड मतांनी विजयी होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी व्यक्त केला. महाजन हे संयमी आणि मुद्देसूद बोलण्यासाठी ओळखले जातात. त्यांच्या पक्ष प्रवेशाने यापुढे शिवसेनेला बळकटी मिळेल आणि ते शिवसेनेचे काम ते जनतेपुढे प्रभावीपणे मांडतील, असा विश्वास उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी व्यक्त केला.

## दुरांतो एक्सप्रेसला कल्याण जंक्शनवर थांबा देण्याची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण हे केवळ स्टेशन नाही, तर लाखो प्रवाशांच्या आयुष्याची नाडी आहे. विदर्भ-नागपूर, भुसावळला जाणाऱ्या दुरांतो एक्सप्रेसला कल्याणमध्ये थांबा नसल्याने सामान्य प्रवाशांचे हाल होत आहेत. हा अन्याय दूर करण्यासाठी आम्ही कल्याणकर सामाजिक संस्थेचे अध्यक्ष नितीन निकम यांनी बुधवारी कल्याण लोकसभेचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेऊन,



दुरांतो एक्सप्रेसला कल्याण जंक्शनवर थांबा देण्याची आग्रही मागणी केली. खासदारांनी विषयाचे गांभीर्य ओळखून हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले आहे.




## केडीएमसी निवडणुकीत ठाकरे बंधूंच्या जागावाटपाचा तिढा सुटला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : आगामी कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा जागा वाटपाचा तिढा सुटला असून दोन्ही पक्षांना सन्मानपूर्वक जागा मिळाल्या असल्याची माहिती शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण पश्चिम आणि मुरबाड विधानसभा जिल्हा प्रमुख अल्पेश भोईर यांनी दिली. तर ठाकरे बंधूंची झालेली युती पाहुणे भाजपा आणि शिंदे गटाने देखील युती केली असून नगराध्यक्ष निवडणुकीत एकमेकांचे फाडलेले कपडे महापालिका निवडणुकीत पुन्हा एकमेकांना घालण्याचे काम करत असल्याची टीका देखील अल्पेश भोईर यांनी केली आहे.



पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी युतीची घोषणा केल्यानंतर कल्याण डोंबिवलीत देखील शिवसैनिक आणि मनसैनिक युतीकरण्याच्या दृष्टीने कामाला लागलो आहोत. केडीएमचीच्या 122 जागांपैकी सन्मानपूर्वक जागा मनसेला देण्यात आल्या आहेत. येत्या एक दोन दिवसांत दोन्ही पक्षांचे नेते पत्रकार परिषद घेऊन याबाबत घोषणा करणार असून या जागा वाटपाचा तिढा सुटला असल्याचे अल्पेश भोईर यांनी सांगितले. तर याआधी झालेली नगराध्यक्षपदाची निवडणूक संपूर्ण महाराष्ट्राने बघितली असून, सत्तेत असलेल्या भाजपा आणि शिंदे गटाने एकमेकांचे कपडे फाडण्याचे काम केले. मात्र आता महापालिका निवडणुकीत दोघेही एकमेकांचे कपडे घालण्याचे काम करत आहेत. हा प्रकार जनता बघत आहे त्यामुळे येणाऱ्या निवडणुकीत महापालिकेवर सेना मनसेचा झेंडा फडकल्याशिवाय राहणार नाही असे अल्पेश भोईर यांनी सांगितले.

**नगराध्यक्ष निवडणुकीत एकमेकांचे फाडलेले कपडे महापालिका निवडणुकीत घालण्याचे काम भाजपा, शिंदे गट करत आहे**

**शिवसेना उद्धव बाळसाहेब ठाकरे उबाठा जिल्हा प्रमुख अल्पेश भोईर यांची टीका**

## मतदान प्रशिक्षणास गैरहजर राहिलेल्यांवर शिस्तभंगाची कारवाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदान केंद्रावर काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, या प्रशिक्षण कार्यक्रमास गैर हजर राहिलेल्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार असून तसे आदेश ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.

ठाणे महापालिका निवडणुक मतदान प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक आणि नियमबद्ध पार पडावी, यासाठी मतदान केंद्रावर काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. महापालिकेच्या निवडणुकीसाठी २०१३ मतदान केंद्रावर एकूण १० हजार




**ठाणे महापालिका आयुक्तांनी दिले कारवाईचे आदेश**

१२० कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रावर करावयाची कामे, ईव्हीएम हाताळणी याचे प्रशिक्षण देण्याचे नियोजन पालिकेने आखले होते. राम गणेश गडकरी रंगायतन आणि डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे प्रशिक्षण कार्यक्रम पार पडला.

# लिप्पन आर्ट : माती–आरशातून उमलणारी परंपरा

**परंपरेची नक्षी, आधुनिक सजावटीचा साज...**

भारतीय कला-वारशात पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक दृष्टिकोनाचा सेतू बांधणारे काही हात आपल्याला प्रेरणा देतात. त्यापैकी एक नाव म्हणजे गौरी रितेश नरगले. नांदेडची कन्या आणि सध्या ठाण्यात वास्तव्यास असलेली ही कलाकार लिप्पन आर्टच्या माध्यमातून परंपरेला आधुनिकतेची उजळ साथ देत आहे.

लिप्पन आर्ट — कच्छ प्रदेशातील शेकडो वर्षांची लोककला — स्थानिक भाषेत 'मड-मिरर वर्क' म्हणून ओळखली जाते. गोमाती माती, गव्हाचा/साखरेचा लेप, नैसर्गिक रंग आणि आरश्यांचा वापर करून उभ्या-आडव्या भूमिती, सण-उत्सव, निसर्ग आणि देवतांशी निगडित आकृत्या साकार होतात. पूर्वी ही कला घरांच्या भिंतींना जिवंत रुप देत असे; आरश्यांवर पडलेला प्रकाश त्या भिंतींना दिवसभर सजीव ठेवायचा.

गौरी — प्रसिद्ध व्यापारी स्व. शिवकुमार शिवपुजे व शालिनी शिवपुजे यांची कन्या आणि नांदेड भूषण राजेंद्र हुरणे यांची भाची — लहानपणापासूनच कलेशी जोडलेल्या. जी.डी. आर्टचे शिक्षण घेतल्यानंतर लग्न, संसार आणि मुलांच्या जबाबदाऱ्या सांभाळत त्यांनी कलेशी असलेलं नातं अजून दृढ केलं.



ठाण्यातील आपल्या घरातून त्यांनी कार्यशाळा आणि ऑनलाईन प्रशिक्षण सुरू केले. बेरोजगार व हौशी महिलांना त्यांनी केवळ कला शिकवली नाही; तर स्वरोजगाराचं स्वप्न दाखवलं. आजपर्यंत १५००हून अधिक प्रशिक्षार्थींना त्यांनी लिप्पन आर्टची ओळख करून दिली आहे — अनेक महिलांच्या हाताला काम, घरात उत्पन्न आणि मनात आत्मविश्वास मिळाला.

त्यांच्या कलेत साधेपणातली देखणी रचना आणि डिझाइन-समज स्पष्ट जाणवते. मधुमती डॉट-मंडला, वारली पेंटिंग यांसारख्या कलारूपांमध्येसुद्धा त्या प्रयोगशील आहेत. "कला म्हणजे Stress-Buster," असे त्या हसत सांगतात — आणि ते त्यांच्या शांत, सजग कामात दिसून येते. आज त्यांच्या कलाकृती नामांकित कलावंत, संस्था आणि देश-विदेशातील रसिकांच्या घरांची शोभा वाढवत आहेत.

गौरींच्या घरी भेट देताना प्रत्येक फ्रेममागे असलेली कथा ऐकताना वेळ कसा गेला, कळलेच नाही. जाणवलं—लिप्पन आर्ट ही फक्त सजावट नाही; ती गावांचा इतिहास, स्त्रियांची श्रमसंस्कृती आणि भारतीय परंपरेचा सजीव दुवा आहे.

त्यांच्या मते, परंपरा जपत नवकल्पनांना सामावून घेतल्याशिवाय कला जिवंत राहत नाही. म्हणूनच त्या डिझाइन, रंगसंगती आणि मांडणीमध्ये सातत्याने प्रयोग करतात.

गौरी भावुकपणे सांगतात, "बाबांनी मला शिकवलं—स्वतःच्या पायावर उभं राहून सन्मानाने जगायचं आणि आवड जोपासायची. त्यांचीच प्रेरणा माझ्या प्रत्येक कलाकृतीत जिवंत आहे."

नांदेड—ठाणे या दोन शहरांना जोडणाऱ्या त्यांच्या या कलाप्रवासाने अनेकांना दिशा दिली आहे. परंपरा आणि आधुनिकतेचा संगम जपणाऱ्या गौरी रितेश नरगले यांचं यश आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे — आणि लिप्पन आर्टची उजळ परंपरा पुढील पिढ्यांपर्यंत नेण्याचं आश्वासनही.

— विजय होकर्णे

## माणुसकी सेवा संघांतर्फे रक्तदान शिबीर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : माणुसकी सेवा संघ, रॉबिनहूड आर्मी, संस्कृती वाद्य पथक आणि आपली सेवा संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे रक्तदान शिबिर वामनराव पै सभागृह, कल्याण पश्चिम येथे मोठ्या उत्साहात पार पडले.

या शिबिरात १८० हून अधिक नागरिकांनी सहभाग घेतला आणि संकल्प ब्लड बँकेच्या सहकार्याने एकूण ११४ बाटल्या रक्त संकलन करण्यात आले. यामध्ये ७ जणांनी प्रथमच रक्तदान करून माणुसकीची भावना जपली.

रक्तदानासोबतच नेत्र तपासणी, दंतरोग तपासणी आणि आहारतज्ज्ञ सल्ला अशा मोफत वैद्यकीय सेवा देखील देण्यात आल्या ज्याचा अनेकांनी लाभ घेतला.शिबिराच्या शेवटी संपूर्ण डॉक्टर पॅनल, ब्लड बँक स्टाफ आणि सीआरएल कल्याण सायकल ग्रुपचा विशेष सत्कार करण्यात आला. या सायकल ग्रुपने सलग ५ वर्षे कल्याण ते शिर्डी सायकल यात्रा पूर्ण केली आहे, जे एक प्रेरणादायी कार्य आहे. हे सर्व सायकलिस्ट, कुठल्या ना कुठल्या मार्गाने माणुसकीशी जोडले गेले आहेत.

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व रक्तदाते, स्वयंसेवक व सहकार्य करणाऱ्या संस्थांचे माणुसकी सेवा संघातर्फे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. असे उपक्रम हे सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण असून, माणुसकी सेवा संघाचे सेवाभावी कार्य पुढेही असेच चालू राहील असे यावेळी कार्यकर्त्यांनी सांगितले.

## मनसेच्या कल्याण पूर्व विधानसभा अध्यक्षपदी निर्मल निगडे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने कल्याण पूर्वेत काही पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामध्ये कल्याण पूर्वची जबाबदारी उच्चशिक्षित युवा नेत्तृत्वाकडे देण्यात आली असून कल्याण पूर्व विधानसभा अध्यक्ष पदी निर्मल निगडे यांची राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आज निवड करण्यात आली. याबाबतचे नियुक्ती पत्र राज ठाकरे यांच्याहस्ते निर्मल निगडे यांना देण्यात आले. यावेळी मनसे नेते राजू पाटील आणि जिल्हाध्यक्ष अविनाश जाधव उपस्थित होते. निगडे हे गेली अनेक वर्षे मनसेमध्ये कार्यरत असून पक्षाने दिलेली नवीन जवाबदारी योग्य रीतीने पार पाडत पक्ष संघटना वाढीसाठी आणि आगामी निवडणुकीत मनसेचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे निर्मल निगडे यांनी सांगितले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज,खर्डी
मुंबई विद्यापीठाशी संलग्न "नॅक मूल्यांकन प्राप्त B Grade"
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT)
UNDER GRADUATE: B.Sc. I.T. | B.Sc. CHEMISTRY MATHS | B.A.F. | BAMMC | B.Com. | B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT | M.Sc. CHEMISTRY | M.Com. ADVANCED ACCOUNTANCY | M.A. MARATHI | M.A. ECONOMICS | M.A. SOCIOLOGY | M.A. GEOGRAPHY
Look forward to a BRIGHTER FUTURE
8669244522
9923992390

# के. डी. एम. सी. वर पुन्हा महायुतीचा भगवा फडकवा

### - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## मेळाव्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे शिवसैनिकांना आवाहन




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : "कल्याण-डोंबिवली महापालिकेवर पुन्हा भगवा फडकवण्यासाठी आपण सज्ज झालो आहोत. आजची ही प्रचंड गर्दी पाहून विरोधकांना धडकी भरली असेल. शिवसेना कधीही हिंदुत्व सोडणार नाही आणि संकटात शिवसेना लोकांच्या दारात उभी राहते," असे ठाम प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. डोंबिवली पश्चिमेतील सम्राट चौक येथे आज २६ डिसेंबर रोजी झालेल्या शिवसेनेच्या भव्य निर्धार मेळाव्यात ते बोलत होते.

कल्याण-डोंबिवली महापालिकेवर पुन्हा एकदा भगवा फडकवण्याचा निर्धार या मेळाव्यातून ठामपणे व्यक्त करण्यात आला. आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या मेळाव्यात शिवसैनिकांची मोठी गर्दी होती. नगरपरिषद निवडणुकीत मिळालेल्या यशाबद्दल आभार व्यक्त करताना एकनाथ शिंदे म्हणाले, "ही शिवसेना चांद्यापासून बांद्यापर्यंत पोहोचलेली आहे. मुख्यमंत्री असताना माझं काम जनतेने पाहिलं आहे. मी कालही कार्यकर्ता होतो, आजही आहे आणि उद्याही राहीन. कार्यकर्त्यांनी तळागाळात जाऊन काम करत राहावं." लाडकी बहीण योजनेचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, "मुख्यमंत्री झाल्यावर काहीतरी आपल्या माता-भगिनींसाठी करायचं, या विचारातूनच लाडकी बहीण योजना सुरू झाली. ही योजना बंद होणार नाही. मी जे बोलतो ते करून दाखवतो आणि जे बोलत नाही तेही करून दाखवतो."कल्याण-डोंबिवली ही सांस्कृतिक आणि हिंदुत्वाची नगरी असल्याचे सांगितले. "गरिबी पाहिलेला माणूस मुख्यमंत्री झाला आहे. मी कोट्यवधी भगिनींचा भाऊ आहे. जनताच माझी खरी कमाई आहे," असे सांगत शिंदे यांनी महायुतीला जनतेचा पाठिंबा असल्याचा विश्वास व्यक्त केला. मुंबई खड्डेमुक्त करण्याचा निर्णय, शिक्षण, आरोग्य, उद्याने, शाळा आणि क्लस्टर पुनर्विकास योजनांवर त्यांनी भाष्य केले. "खरा कोण आणि खोटा कोण हे जनतेनेच ठरवले आहे. जो कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडतो, त्यांना जनताच घरी बसवते," अशा शब्दांत त्यांनी विरोधकांवर टीका केली. डोंबिवलीकरांनी २०१४ पासून दिलेल्या प्रेमाचा उल्लेख करत त्यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कामगिरीचे कौतुक केले. "आत्मविश्वास, जिद्द, कष्ट आणि मेहनत या यशाच्या पायऱ्या आहेत. आता कल्याण-डोंबिवलीत पुन्हा भगवा फडकवूया," असे आवाहन करत त्यांनी भाषणाची सांगता केली.

## मातोश्री महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय निवासी शिबीर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय विशेष निवासी शिबिर मुरबाड तालुक्यातील साजई येथे दिनांक १८ डिसेंबर २०२५ ते २४ डिसेंबर २०२५ या कालावधीत आयोजित करण्यात आले.




शिबिराचे उद्घाटन प्रसिद्ध कवी, लेखक व समाजसेवक डॉ.गिरीश लटके सरपंच पुष्पा सासे व प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक, नाटककार एकनाथ देसले यांच्या हस्ते झाले. या सात दिवसीय निवासी शिबिरात ग्रामसफाई, पर्यावरण जनजागृती संदर्भात उपक्रम राबवण्यात आले. सामाजिक उपक्रम म्हणून गावातील नागरिकांना फळभाज्यांच्या बियाणांचे वाटप करण्यात आले. प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळावा म्हणून राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी तयार केलेल्या कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. शिबिर स्थळी राष्ट्रीय सेवा योजनेमार्फत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिराला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिर स्थळी अनेक मान्यवरांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. वाईल्ड लाईफ अवेअरनेस, करियर गायडन्स, पथनाट्य सादरीकरण व विविध वैचारिक विषयांवर स्वयंसेवकांसाठी व्याख्याने आयोजित करण्यात आली. शिबिराच्या समारोप प्रसंगी साजई गावच्या सरपंच पुष्पा सासे व ग्रामसेवक प्रणाली अधिकारी, सदस्य पुष्पा देसले उपस्थित होत्या.शिबिराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. कविता मांजे व प्रा सुनंदा शिंदे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. शिबिराच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. चिंतामण भोईर व शाहू शिक्षण संस्था शहाडचे व्यवस्थापकीय संचालक डॉ. सूर्यकांत भोसले, अध्यक्ष जयंतीभाई हरिया, यांचे मार्गदर्शन लाभले.

# पंचतत्वात विलीन झालेल्या पितरांसाठी

काल माझे आजी माझ्या स्वप्नात आली. मला जवळ घेऊन विचारपूस केली. मला खूप आनंद झाला. तिने विचारले बाळा तू कसा आहेस? मी तिला मानेनेच हो म्हणून उत्तर दिले. त्यानंतर आमच्या घरातील सर्वच मंडळी तरकून गेली. माझ्या कुटुंबात आम्ही आठ भाऊ आई-वडील आजी आजोबा पणजी व पणजोबा आमची मंडळी खूप आनंदात जगत होती. आमचे घर छोटेसेच परंतु छोटे कधी वाटलेच नाही. छोट्याशा झोपडी वजा घरात आम्ही पंच पक्वान्न खात नसू पण चटणी भाकरी किंवा भाकरी कालवण मिळत होते. अशीच जीवनपद्धती सर्वच ठिकाणी होते. सुमारे 70 वर्षांपूर्वी होती सर्व खेडे गावातली मंडळी गुण्यागोविंदाने नांदत होती. कोणी आजारी असेल त्याची सेवा सुद्धा आपुलकीने केली जाई. भाऊ बहीण आजी आजोबा काका काकू आत्या मामा ही नाती जपली जायची. गरीब असूनही मुलीला मुल माहेर होई. भाऊबीजेला बहिणीला साडी मिळे. आहेर व लेणे असे सूप दिले जाई.

ब्रिटिशांचे राज्य आले शिक्षण घेऊन माणसे शिक्षित झाली अन घराची व्याख्याच बदलली.

**"झोपडी होती तर माणसे मायंदळ उंच माडी झाली आणि मानसी त्रिदळ"**

अशी अवस्था झाली. मुले शहरात नोकरी निमित्ताने गेली. कोणी परदेशात गेली. खेड्यात मात्र त्यांचे आई-वडील आजी-आजोबा राहिले. त्याचा अशिक्षित पणा त्यांचे वेगळेपण सांगून गेला. नोकरी निमित्ताने मुलगा व सून दोघेही काम निमित्ताने गेल्यावर त्यांचा वेळ मिळेनासा झाला. आता माता पित्याचे काय काय करायचे? असा प्रश्न पडला नव्याची नवलाई झाली जागोजागी वृद्धाश्रमे आली

ज्यांनी कोणी वृद्धाश्रमाची कल्पना काढली असेल त्यांचे कौतुक करावे तेवढे कमी. यासाठी लेखक शिरवाडकर यांनी नटसम्राटा सारखा नाटक जनतेसमोर आणले त्यात त्यांनी सद्यस्थितीचे यथार्थ वर्णन केले ज्या गणपतराव बेळवणकरांनी आपल्या मुलांना शिक्षण दिले. आयुष्याची सर्वच कमाई त्यांच्यासाठी उधळली. त्याच मुला-मुलींनी त्याला वाऱ्यावर सोडून दिले इतकेच काय तर मुलीच्या घरात बाप चोर ठरला. असा नटसम्राट म्हणतो "कुणी घर देता का घर" याला काय म्हणावे? मग त्यापेक्षा रस्त्यावर बूट पॉलिश वाल्यांनी जी माया केली ती मुला-मुलीत का नसावी. नटसम्राटांचे सरकारांचे मेल्यावर त्यांचे सर्व विधी कसे झाले असतील त्याची कल्पना न केलेली बरी. त्याच्या पुढे जाऊन विल्यम शेक्सपियरचे नाटक अथेल्लो तरी काय सांगतो. त्यांनी आपल्या दोन मुली आईबाप नसतानाही हाताच्या फोडाप्रमाणे वाढविल्या आपली सर्व संपत्ती त्यांच्यावर न्योछावर केली. स्वतःसाठी काही शिल्लक ठेवले नाही. याच मुलींनी त्याचा विश्वासघात केला. त्यावेळी ह्या बापाला किती यातना झाल्या असतील याची कल्पना तो एक बापच जाणू शकतो. म्हणून तोच अथेल्लो म्हणतो माझ्या डोळयात जेव्हा आसवं जमा होतील तेव्हा मी डोळयांच्या खाचा करीन पण मी रडणार नाही. केवढे मोठे दुर्दैव यासाठी चारोळी

**"कोण कुणाचाकधीच नसतो<br>आपण आपल्यातच फसतो<br>आयुष्यभराचे करा गणित<br>तिसरा अंक अश्रुनी<br>भिजलेला असतो"**

परवाच माझा एक मित्र भेटला. तो एक हॉस्पिटलमध्ये सिटीस्कॅन ऑपरेट होता.त्यांचे हॉस्पिटलमध्ये एक वृद्ध गृहस्थ उपचारासाठी आला. श्रीमंत होता.

उपचारासाठी एकटाच आला होता तो आपल्या देहाचा सिटीस्कॅन करण्यासाठी आला होता त्याचे सोबत घरातले कोणीही नव्हते. त्याचे सोबत त्याचे शेजारची व्यक्ती आली होती. त्याला जेव्हा सिटीस्कॅन मशिनीत आत घेतले तेव्हा त्याला अटॅक आला. तिथेच त्याचा अंत झाला हॉस्पिटल प्रमुखाला मोठा प्रश्न पडला आता काय करावे? त्यांनी त्याच्या जवळ असलेल्या बॅगेतून त्याची कागदपत्रे काढली त्यात त्याला त्याच्या परदेशात असलेल्या मुलाचा फोन नंबर होता त्यांनी मुलाला फोन केला तेव्हा मुलगा म्हणाला सध्या मी एका महत्त्वाच्या मीटिंगमध्ये आहे मला येणे शक्य नाही. तुम्ही चार माणसे घेऊन त्यांचे दहन कार्य करावे. त्यासाठी आपण आपला मोबाईल नंबर द्या मी तुम्हाला पैसे पाठवतो. हॉस्पिटल प्रमुखांनी त्यांचे मुलीला फोन केला तेव्हा मुलगी म्हणाली माझी तब्येत बरी नाही तेव्हा मी येऊ शकत नाही दादा काय म्हणतील त्याप्रमाणे करावे. शेवटी हॉस्पिटल प्रमुखांनी चार माणसे घेऊन त्या इसमाचे अंत्यविधी केले. त्याला काय म्हणावे? त्याची जळीत झाले. अस्थी कोठे ठेवणार? त्यांची दशक्रिया कोण करणार? त्यांचे उत्तरकार्याचे काय? सर्वच प्रश्न अनुत्तरीत आहेत. हेच का पितृप्रेम हीच का माया? हेच का आपले कर्तव्य?.

परवाच मी एका जवळच्या वृद्ध नातलगाच्या तेरावे साठी गेलो होतो तेराव्यासाठी घरातील नातेवाईक मंडळीने चांगले चांगले पंच पक्वानांचे पदार्थ आणले होते .त्यात तिखट गोड पदार्थाचा समावेश होता. तेराव्याचा पूर्ण विधी झाल्यावर दुपारच्या वेळी सर्व पदार्थांनी भरलेल्या भाना भरला. भाना म्हणजे एक मोठे परात. त्या भाण्याची घरातील मंडळी व नातेवाईक यांनी पूजा केली त्या परातातील प्रत्येक प्रकारचा पदार्थ एका पत्रावळीतून घेतले. ती पत्रावळी एका सुपात घेऊन ते पात्र घरावर ठेवण्यासाठी नेले. घरावर ते पात्र ठेवल्यावर घरातील प्रमुखांनी पितरांना म्हणजेच कावळयांना आवाहन केले. काव काव काव बराच वेळ झाला. कावळा शिवला नाही. तेव्हा त्याच्या शेजारचा एक इसम म्हणाला माणसाने नेहमी शिळेपाके खाल्लेले. एवढ्या चांगल्या पंच पक्वानांची सवय नाही मग कावळा कसा शिवणार कसा? कावळा शिवला नाही शेवटी दर्भाचा कावळा करून पात्र उस्टावले नंतर सर्व हजर असलेल्या माणसांना जेवण मिळाले. माता पित्याची सेवा करणारे असणार नाही असे नाही पण तो एक अपवाद समजावा. अपवादानेच नियम सिद्ध होतो. मुले मुले आपल्या आई-वडिलांची सेवा करणार नसतील तर वृद्धाश्रम हवेत. वृद्धांच्या मदतीला आज आपण यौवनाच्या धुंदीत आहोत. आपला उत्तर काळ सुखाने कसा जाईल याचा विचार आताच करा. नंतर आपणास पश्चाताप झाल्याशिवाय राहणार नाही यासाठी कवितेच्या चार ओळी केवळ विठ्ठलाला आपण म्हणतो माऊली माता पित्यांनी सर्वस्व अर्पण केली साऊली घरात आई-वडिलांचा असेल वावर आपोआपच उघडे स्वर्गाचे दार

**श्री.गिरीधर पिंगळे गुरुजी**
**गोरठण बुद्रुक**
**वावोशी खालापूर**

## भविष्यवेध



रविवार
२८ डिसेंबर २०२५

**मेष**
तुमचे लक्ष फक्त कामावर केंद्रित असेल आणि यशासाठी तुम्ही कठोर परिश्रम करण्यास तयार असाल. तुम्ही अधिक लोकांशी संपर्क साधाल.

**वृषभ**
निकालांची चिंता न करता कठोर परिश्रम केले तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. तुम्ही नवीन लोकांना भेटाल आणि व्यवसायात अनपेक्षित नफा अनुभवाल.

**मिथुन**
तुमची नियोजित कामे आणि योजना यशस्वी होतील. प्रलंबित कामे पूर्ण करण्यात नशीब तुमची साथ देईल. तुमचे गुण आणि काम तुम्हाला आदर देईल.

**कर्क**
तुम्ही जितके जास्त काम कराल तितके तुम्हाला अधिक प्रतिफळ मिळेल. तुम्ही महत्त्वाच्या कामांवर लक्ष केंद्रित कराल. जबाबदाऱ्या वाढतील.

**सिंह**
नवीन व्यवसाय किंवा नोकरीच्या संधी शोधणाऱ्यांसाठी हा अनुकूल काळ आहे. तुमचा आत्मविश्वास वाढेल.तुमच्या व्यक्तिमत्त्वाची प्रशंसा होईल.

**कन्या**
तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. कामाच्या ठिकाणी तुम्हाला नवीन जबाबदाऱ्या मिळतील, ज्या यशस्वीरित्या पूर्ण कराल. आहाराकडे लक्ष द्या.

**तुळ**
विद्यार्थ्यांना यश मिळविण्यासाठी थोडे अधिक परिश्रम करावे लागतील. व्यवसाय आणि करिअरमधील समस्या सोडवल्या जातील. घाईघाईने निर्णय घेऊ नका.

**वृश्चिक**
वाढलेला आत्मविश्वास प्रलंबित कामे पूर्ण करण्यास मदत करेल. अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. जोडीदाराशी चर्चा केल्याने काही उपाय सापडेल.

**धनु**
कुटुंबाशी चर्चा केल्याने समस्या सुटतील. बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्यांना प्रगतीची, नवी संधी मिळेल. व्यावसायिक सहभाग अनुकूल ठरेल.

**मकर**
विद्यार्थ्यांना अभ्यासात चांगले निकाल मिळतील. घरात शांती आणि आनंद राहील. मित्राच्या मदतीने समस्या सोडवता येतील. गुंतवणुकीतून नफा मिळू शकेल.

**कुंभ**
तुमच्या व्यवसायात नवीन प्रकल्प उपलब्ध होतील. तुम्हाला परदेश प्रवासाचे आमंत्रण मिळू शकेल. तुमच्या प्रियकराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळतील.

**मीन**
तुमच्या सहकाऱ्यांच्या मदतीने तुमचे काम वेळेवर पूर्ण होईल. तुमच्या खाण्याच्या सवयींकडे लक्ष द्या. महिलांना खरेदीवर सवलत मिळू शकते.

## अनधिकृत बांधकाम करणार नसल्याचे शपथपत्र उमेदवारांना बंधनकारक

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी :** भिवंडी महानगर पालिका क्षेत्र अनधिकृत बांधकामांची बजबजपुरी म्हणून ओळखली जाते .नव्हेच तर अनेक अनधिकृत बांधकामांमध्ये नगरसेवक छुप्या मार्गाने सहभागी असतात अथवा त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश असतो.अशा परिस्थितीत सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारांना अनधिकृत बांधकाम करणार नसल्याचे शपथपत्र देण्याचे निवडणूक आयोगाने बंधनकारक केले आहे. नगरसेवक म्हणून निवडून येण्या नंतर बहुतांश नगरसेवकां चा व्यवसाय हा बांधकाम व्यावसायिक असा होतो. त्यामुळे आता निवडणून येणाऱ्या नगरसेवकांना बांधकाम व्यवसाय करताना विशेष खबरदारी घ्यावी लागणार आहे.

निवडणूक आयोगाच्या उमेदवारी अर्जातील अट क्रमांक १६(५) या नुसार उमेदवाराने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० मुंबई महानगरपालिका अधिनियम,१८८८ च्या कलम १६ मधील तरतुदींचे वाचन करून त्यानुसार महानगर पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अपात्र नाही.मी स्वतः अथवा माझी पत्नी/माझे पती अथवा अवलंबित यांनी कोणतेही अनधिकृत बांधकाम केलेले नाही.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम १० (१९)/ मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १६(१ड) मधील तरतुदी नुसार जर मी निवडून आल्यावर अनधिकृत बांधकाम केले असल्याचे सिध्द झाल्यास मी नगरसेवक पदावर राहण्यास अपात्र ठरेल याची मला जाणीव आहे असे प्रतिज्ञापत्र देणे बंधनकारक केले आहे. हे प्रतिज्ञापत्र उमेदवारी अर्ज भरताना देणे बंधनकारक केल्याने भविष्यातील अनधिकृत बांधकाम करणाऱ्या लोकप्रतिनिधी नगरसेवकांना अटकाव करणे प्रशासनास शक्य होणार आहे.

# कल्याण पश्चिमेत 10 प्रभागांसाठी शिवसेनेत 166 इच्छुकांनी दिल्या मुलाखती

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण पश्चिमेतील साई हॉल वायलेनगर येथे शिवसेना शिंदे गटाच्या इच्छुक उमेदवाराच्या मुलाखती शिवसेना उपनेते प्रकाश पाटील, शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, पदाधिकारी सुनील चौधरी आदी शिष्टमंडळाने शनिवारी घेतल्या.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे यांनी सांगितले की, कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूक 2026 या अनुषंगाने प्रत्येक पक्ष आपल्या पक्षातील इच्छुक उमेवारांच्या मुलखती घेत असतात. त्या मुलाखती मधून



जे इच्छुक असतात, जे निवडून येण्यासाठी योग्य असतात, ते काम मुलाखती माध्यमातून सोपे होते. कल्याण पश्चिमेत 10 पॅनल असून 166 इच्छुकांनी अर्ज भरले होते. त्यांच्या आज मुलाखत माध्यमातून, तसेच इच्छुकांचा आत्मविश्वास पाहता उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून झालेले काम पाहता शिवसेनेचे जास्त उमेदवार निवडून येतील असे सांगितले. तर पक्षात बाहेरून आलेल्या पक्षाच्या इच्छुक उमेदवारांमुळे शाखा प्रमुख, गट प्रमुख कार्यकर्ते नाराज असल्याचे विचारले असता, ही प्रक्रिया पूर्वी पासून सुरू आहे. निवडणूकी मध्ये कोण किती वर्षापासून काम करतोय, किंवा त्यांची योग्यता आहे का नाही, पंरतु निवडून येण्याच्या दृष्टीकोनातून कार्यकर्ता चांगलाच असतो. 20 ते 25 वर्षे पासून जे काम करतात त्यांना न्याय मिळाला पाहिजे, पंरतु या पॅनल पध्दतीमध्ये निवडून येणे अत्यंत आवश्यक आहे, त्या बाबतीत विचार केला जातो. उमेदवारी बाबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे अंतिम निर्यण घेतील असेही गोपाळ लांडगे यांनी स्पष्ट केले.

# विरोधकांना चारिमुंडया चित करण्याचा निर्धार करा - एकनाथ शिंदे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** येणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीत महायुतीचा भगवा फडकवून विरोधकांना चारिमुंडया चित करण्याचा निर्धार करा असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. कल्याण पूर्वेतील चक्की नाका येथे आयोजित विजय निर्धार सभेत ते बोलत होते.

यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, आमदार राजेश मोरे, महिला आघाडीच्या ज्योती वाघमारे, उपनेत्या विजया पोटे, जिल्हा प्रमुख गोपाळ लांडगे, अरविंद मोरे, जिल्हा समन्वयक हर्षवर्धन पालांडे, विधानसभा संपर्क प्रमुख महेश गायकवाड, शहर प्रमुख निलेश शिंदे, रवी पाटील, माजी



महापौर रमेश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी एकनाथ शिंदे यांनी सभेत बोलतांना सांगितले की, काही जण बोलत होते शिवसेना ठाण्यापुरती आहे, मात्र शिवसेना चांदा ते बांदा पर्यंत पसरली आहे हे लोकसभा विधानसभा नगराध्यक्ष निवडणूकित दाखवून दिले.कल्याण पूर्वेत विकासाची गंगा आली याचा आनंद आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधकांना पाणी पाजण्याचं काम करायचं आहे. कल्याण पूर्वेचा विकासाचा फैसला करण्याची तारीख 15 जानेवारी आहे.

मुख्यमंत्री असतांना अडीच तास देखील झोपलो नाही. आपण झोपायला नाही तर झोपा उडवायला आलोय. अडीच वर्षात केलेल्या कामाची पोचपावती लोकं देतात. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली काम सुरू असून लोकांची कामं करणे हा आमचा अजेंडा आहे. महाराष्ट्रातील जनता आपल्या पाठीशी असून विकास हाच आमचा अजेंडा आहे. येणाऱ्या निवडणुकीत विरोधकांचा बँड वाजवायचा आहे. ज्यांनी कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडलं त्यांना लोकांनी वाऱ्यावर सोडलं.

### कल्याण पूर्वेत विजय निर्धार सभा

शिवसेना घराघरात पोहोचवायची असून ही कार्यकर्त्यांची निवडणूक नेत्यांनी लढायची आहे. खुर्चीसाठी हिंदुत्वाशी तडजोड करणार नाही. दुसऱ्याची रेष पुसण्यापेक्षा स्वतःची रेष मोठी करा. टिंगल करणारे अडकले सिंगल अकड्यावर. आरोपांना आणि टिकेला कामातून उत्तर देतो. लोकसभा, विधानसभा, नगराध्यक्ष निवडणुकीत शिवसेनेचा स्ट्राईक रेट मोठा आहे. देशात, राज्यात आणि आता महापालिकेत देखील महायुती पाहिजे असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

# महेश गायकवाड एकटा लढला म्हणून पडला, आम्ही बरोबर असतो तर चित्र वेगळे असते - एकनाथ शिंदे

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आपला कल्याण महोत्सवाला भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : मागील विधानसभा निवडणुकीत महेश गायकवाड एकटा लढला आणि पडला, आम्ही महायुतीचा धर्म पाळला, परंतु महेश एकटा लढला, तो पडला, परंतु आम्ही त्याच्या बरोबर असतो तर काय झाले असते ते सांगयची गरज नाही, तो पडला तरीही त्याने लोकांची कामे करण्याची आपली तळमळ सोडली नाही, तो लोकांच्या गळ्यातील ताईत आहे, त्यामुळेच महेश गायकवाड हे कल्याण पूर्वेतील शिवसेनेची भगवी रेष आहेत. कोणी कितीही प्रयत्न केले तरी त्याच्या कपाळावरची भगवी रेष कोणालाही पुसता येणार नाही ' अशा शब्दात शिवसेना पक्षाचे मुख्य नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महेश गायकवाड यांच्या कार्याचे कौतुक केले. आपला कल्याण महोत्सव प्रतिष्ठान आयोजित कल्याण पूर्वेतील १०० फुटी रोडवर सुरु असलेल्या आपला कल्याण



महोत्सवाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्यासह शुक्रवारी रात्री सदिच्छा भेट दिली. यावेळी कल्याण पूर्व आणि उल्हासनगर विधानसभा संपर्क प्रमुख आणि शिवसेनेचे माजी नगर सेवक महेश गायकवाड याचे कार्य हे केवळ मात्र वॉटर - मिटर - गटर पुरते मर्यादीत न रहाता सर्व दूर पसरले आहे, त्या मुळे त्याला जनतेचा आर्शिवाद मिळाल्याने तो मोठ्या संकटातून वाचला असल्याचे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. दरम्यान काही दिवसांपूर्वी भाजपाचे जेष्ठ नेते आणि माजी मंत्री जगन्नाथ पाटील यांनी महेश गायकवाड आणि शिवसेनेवर विधानसभा निवडणुकीत महायुतीचा धर्म पाळला नसल्याचा आरोप केला होता. मात्र या आरोपांना खुद्द उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीच उत्तर दिल्याची चर्चा कल्याण पूर्वेत रंगली आहे.

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उद्यानात नाताळ साजरा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या डोंबिवली पूर्व विभागातील कवयित्री बहिणाबाई चौधरी उद्यानात नाताळ सणानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. २५ डिसेंबर हा दिवस भगवान येशू ख्रिस्तांचा जन्मदिवस तसेच भारताचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती सुशासन दिवस म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी स्वातंत्र्यसैनिक व बनारस हिंदू विद्यापीठाचे संस्थापक पंडित मदन मोहन मालवीय यांचा जन्मदिन असल्याने उपस्थितांनी तिन्ही थोर व्यक्तिमत्त्वांना सामूहिकरीत्या आदरांजली अर्पण केली.या कार्यक्रमात शंभरपेक्षा अधिक नागरिक व व्यायामप्रेमी सदस्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी व्यायाम समितीचे सदस्य सोमार्डे यांनी भगवान येशू ख्रिस्त, माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी तसेच पंडित मदन मोहन मालवीय यांच्या कार्याची माहिती देवून त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी नगरसेवक व खासदार कार्यालयाचे प्रकाश माने यांनी केले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत खेळीमेळीच्या, आनंदी व प्रेरणादायी वातावरणात यशस्वीपणे संपन्न झाला.

# चोरी करणाऱ्या आरोपीस उत्तर प्रदेशमधून अटक

### कल्याण तालुका पोलिसांची उल्लेखनीय कामगिरी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण ग्रामीण** : कल्याण तालुक्यातील समृद्धी मार्गावर निंबवली टोल नाक्यावर दिनेश कुमार यादव हे बेस ऑईल पुरवणाऱ्या कंपनीमध्ये सुपरवाजरची नोकरी करत असून दिनांक १७/१२/२०२५रोजी बेस ऑईल व्यवहाराचे ११,००००० रुपये (अकरा लाख रुपये ) रुपये घेऊन ते डंपरने मुंबईच्या दिशेने समृद्धी महामार्गावरुन जात असता.निंबवली गावाच्या टोल नाक्यावर चहा पिण्यासाठी उतरले होते.डंपर क्र.१२ जी ३०३३डायव्हरने पैशाची बॅग शीटच्या पाठीमागे ठेवली असता आरोपी मकसुद अकतर हुसेन व त्याचा साथीदार अरमान खान दोन्ही रा.पुरावा.पो.ठाणे दुधारा संतकबीर राज्य.उत्तरप्रदेश यांनी ११,०००००रुपये( अकरा लाख ) रुपये चोरून नेल्याची फिर्यादी दिनेश कुमार यादव यांनी १८/१२/२०२५ रोजी



**चोराच्या मुसक्या आवळल्यात पोलीसांना यश**

तक्रार कल्याण तालुका पोलिस ठाण्यात गुन्हा रजि.नं.७०९/२०२५ भा.न्याय . संहिता कलम ३०५ ( सी ) ,३( ५ ) प्रमाणे दाखल असून यातील आरोपी मकसुद अकतर हुसेन हा त्यांच्या पुरवा , उत्तर प्रदेश मुळ गावी असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाल्याने उप पोलिस निरीक्षक विजय डाखोरे, पोलिस शिपाई हरिश्चंद्र झांजे, पोलिस शिपाई मंगेश खिलारे यांचे विशेष पथक

**गुन्हात चोरलेल्या मालापैकी ७००००० रुपये (सात लाख ) टिटवाळा पोलीसांकडून हस्तगत करण्यात यश**

करून पोलिस अधीक्षक डी.एस. स्वामी , यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल व विभागीय पोलिस अधिकारी अनिल लांडे, पोलिस निरीक्षक पंकज गिरी, यांच्या नेतृत्वाखाली स.पो. निरिक्षक नितीन मुदगुन, पोलिस उपनिरीक्षक विजय डाखोरे, पोलिस उपनिरीक्षक जयवंत वारा,पो.हवा.रविंद्र मोरे स्था.गु.शा. इंटरसेपशन,पो.ह.गायकवाड स्था.गु.शा.इंटरसेपशन ,पो. ना.झांजे,पो.शि.मंगेश खिलारे,पो. शि.कुणाल बावदाने,पो. शि.योगेश निर्मळ यांनी उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

# भिवंडी महानगरपालिका निवडणूक आचारसंहितेचा व्यावसायिकांना फटका ?

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका २०२५-२६ सार्वत्रिक निवडणूक निमित्ताने भिवंडी महानगर पालिका कार्यक्षेत्रात आदर्श आचार संहिता लागू केली आहे.त्यामुळे पोलीस व निवडणूक विभाग अधिकारी सतर्क झाले आहेत.शहराच्या वेशीवर पोलीस व पालिका कर्मचाऱ्यांनी तपासणी केंद्र उभारून येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांची तपासणी सुरू केली आहे. भिवंडी शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात यंत्रमाग कारखाने, मोती कारखाने व गोदामासह विविध प्रकारचे उद्योग व्यवसाय सुरु असून अनेकवेळा या व्यवसायाच्या निमित्ताने रोख रक्कमेने व्यवहार सुरु आहेत. अशा प्रकारे रोखीने व्यवहार करणाऱ्या व्यावसायिकांच्या गाड्या अडवून त्यांच्या कडील रोख रक्कम कोणतेही समाधानकारक उत्तर अथवा वैध कागदपत्रे सादर करण्यात आले नसल्याने जप्त करून त्यांना पोलीस ठाण्यात जावे लागत असल्याने त्यांना आचार संहितेचा फटका बसत आहे.त्यामुळे नाराजी व्यक्त केली जात आहे.

भिवंडी शहरात आणि परिसरात कापड विक्री, सोने व चांदीचे दागिने विक्री,यंत्रमाग व्यवसाय,मोती कारखाने आणि गोदाम व्यवसाय सुरु आहे.या व्यवसाय निमित्ताने कामगारांचे पगार आणि इतर व्यापाराच्या निमित्ताने रोख रकमेत द्वारे व्यवहार करावे लागतात.तसेच भिवंडी तालुक्यासह नाशिक,ठाणे,मुंबई येथे जाण्यासाठी भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील विविध मार्गांचा अवलंब करावा लागतो. त्यामुळे भिवंडीत जाणाऱ्या व येणाऱ्या गाड्यांची सर्व मुख्य मार्गावरील स्थिर तपासणी केंद्रातील पोलीस व मनपा कर्मचारी आचारसंहिता पथकाकडून वाहनांची पूर्णपणे तपासणी येथील निवडणुकीच्या निमित्ताने केली जात आहे.

२३ डिसेंबर २५ रोजी शहरातील नदीनाका येथील स्थिर पथकाने सायंकाळी ६-३८ वाजता चारचाकी वाहनातून रोख ८ लाख २८ हजार ९०० रुपये जप्त केले. सदर रकमेबाबत संबंधितांकडे विचारपूस केली असता कोणतेही समाधानकारक उत्तर अथवा वैध कागदपत्रे सादर करण्यात आले नाहीत. त्यामुळे हि रक्कम दोन पंचांच्या उपस्थितीत पंचनामा करून पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी निजामपूर पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांकडे सुपूर्द करण्यात आली.

मागील भिवंडी लोकसभा व भिवंडी विधानसभा निवडणुकीत मोठ्या संख्येने व्यावसायिकांच्या गाड्यांमधून रोख रक्कम जप्त केली होती.अशी प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हाधिकारी स्तरावर एक कमिटी स्थापन केली होती.त्यामध्ये संबंधितांची कागदपत्रे पाहून त्याचा निवाडा केला जात होता. मात्र महानगरपालिका निवडणुकीत स्थानिक पातळीवर कमिटी स्थापन करण्याचे निर्देश राज्य शासनाच्या निवडणूक पुस्तकात दिले आहेत. मात्र या कमिटीवर कोणत्या पदाधिकाऱ्यास नियुक्त करावे, याची माहिती दिली नसल्याने अद्याप रोख रकमेबाबत निवडा देणारी कमिटी नेमण्यात आलेली नाही.त्यामुळे व्यावसायिकांची रोख रक्कम अडकून राहण्याची भीती व्यक्त केली जात असून,सध्या तरी अशी प्रकरणे प्रलंबित राहणार असल्याचे चित्र आहे. या बाबत माहिती घेतली असता राज्य निवडणूक आयोगास हि कमिटी नेमण्याकरिता मार्गदर्शन करण्याच्या निमित्ताने पत्र दिल्याचे आचारसंहिता विभागाने सांगितले.

# शिक्षकांच्या टिईटी संदर्भात शासनाने पुनर्विचार करावा - राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाची मागणी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण :** राज्यातील शिक्षकांवर लागू असलेल्या शिक्षक पात्रता परीक्षा (TET) संदर्भातील अटी व अंमलबजावणी बाबत शासनाने तातडीने पुनर्विचार करावा, अशी जोरदार मागणी राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ यांच्यावतीने करण्यात आली आहे.

यासंदर्भात संघाच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार प्रवीण स्वामी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. TET परीक्षा ही गुणवत्तेसाठी आवश्यक असली तरी अनेक वर्षांपासून सेवा बजावत असलेल्या शिक्षकांवर ती अन्यायकारक ठरत असल्याची भावना शिक्षक वर्गात आहे.विशेषतः ओबीसी, बहुजन व ग्रामीण भागातील शिक्षकांना



या अटींमुळे मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे संघाने निवेदनात नमूद केले.

सेवेत असलेल्या शिक्षकांना अनुभवाच्या आधारे सवलत देणे, वारंवार परीक्षा घेण्याऐवजी पर्यायी मूल्यमापन पद्धती राबवणे तसेच अपात्र ठरवलेल्या शिक्षकांच्या सेवासुरक्षेबाबत स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशा मागण्या यावेळी करण्यात आल्याआमदार प्रवीण स्वामी यांनी शिक्षकांच्या भावना समजून घेत शासन पातळीवर हा मुद्दा मांडण्याचे आश्वासन दिले. शिक्षकांच्या हिताचे निर्णय होण्यासाठी आपण पाठपुरावा करू, असे त्यांनी सांगितले. या मागणीमुळे शिक्षकांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले असून शासनाने सकारात्मक

### आमदार प्रविण स्वामींना निवेदन

निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाने व्यक्त केली आहे. यावेळी राज्य सरचिटणिस संतोष भोजने,धाराशिव जिल्हाध्यक्ष अनंत फुलसुंदर प्रसिध्दीप्रमुख व प्रवक्ते पंकज काटकर,तुळजापूर तालुकाध्यक्ष शरद सोनटक्के, उमरगा तालुकाध्यक्ष परमेश्वर साखरे राज्य सदस्य तानाजी हजारे, आदर्श शिक्षक विक्रम पांचगे अशोक खडके, नानासाहेब कवडे,स्वामी सर,शामराव कोयले व्यंकट क्षिरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.

# आसनगाव स्थानकात पोलीस मदत कक्ष प्रवाशांच्या सेवेसाठी सुरु




**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण- कसारा मार्गावरील मोठे स्थानक म्हणून आसनगाव स्थानकाकडे पाहिले जाते, या स्थानकातून दिवसाला ५० हजारापेक्षा जास्त प्रवाशी प्रवास करतात. नव्यानेच १५ ऑगस्ट २०२५ रोजी आसनगाव येथे पोलिस ठाणे सुरू करण्यात आले आहे.यात ५८ पोलीस अधिकारी , कर्मचारी आणि ४० होमगार्ड कार्यरत आहेत. टिटवाळा ते कसारा अशी एकूण ९ रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची सुरक्षा करण्यात येत आहे. आसनगाव हे शहापूर तालुक्यातील एकमेव असे स्थानक आहे की, या स्थानकातून शहापूर तालुक्यातील ४० ते ५० गावातील,खेड्यापाड्यातील *नागरीक येथूनच प्रवास करतात. प्रवाशांना रेल्वे प्रवासादरम्यान *चांगली सुरक्षा मिळावी या साठी कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेच्या माध्यमातून मागील आठ वर्षांपासून पोलिस स्टेशन सुरू करावे यासाठी पाठपुरावा सुरू होता, अखेर १५ ऑगस्ट २०२५रोजी उद्घाटन करण्यात आले आहे. आज कल्याण कसारा कर्जत रेल्वे प्रवासी संघटनेचे अध्यक्ष श्री राजेश घनघाव यांच्या हस्ते आसनगाव स्थानकात पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन करण्यात आले, सोबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सचिन मोरे, प्रवाशी संघटनेचे कसारा स्थानक प्रतिनिधी श्री युवराज पंडित , सहा पोलिस निरीक्षक सौ.भगत,पोलीस, हेड कॉन्स्टेबल चव्हाण,कॉन्स्टेबल श्री.शेवाळे, श्री शिंदे , श्री.शहारे, श्री.रावते , श्री चव्हाण आणि मोठ्या प्रमाणात प्रवाशी उपस्थित होते. सदरचे मदत केंद्र मधल्या ब्रीज जवळ सुरू करण्यात आले आहे. प्रवासादरम्यान प्रवाशांनी पोलिस कक्षाचा लाभ घ्यावा असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सचिन मोरे यांनी केले आहे.

ठाणे ■ रविवार
२८ डिसेंबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
पान ४

# बेपत्ता ११ वर्षीय शुभम दीड दिवसाच्या शोधानंतर बांद्रा येथे सापडला

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील टिटवाळा नजीकच्या बल्याणी परिसरातून बेपत्ता झालेला ११ वर्षीय शुभम कुमार अर्जुन जयस्वाल अखेर पश्चिम रेल्वे मार्गावरील बांद्रा परिसरात सुखरूप आढळून आल्याने कुटुंबीयांसह संपूर्ण परिसराने सुटकेचा निःश्वास टाकला आहे. तब्बल दीड दिवस चाललेल्या व्यापक आणि सातत्यपूर्ण शोधमोहीमीनंतर हा महत्त्वाचा शोध लागला. बनेलीतील गुप्ता चाळ परिसरात राहणारा शुभम सोमवारी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास भाजी आणण्यासाठी घराबाहेर पडला होता. मात्र बराच वेळ उलटूनही तो परत न आल्याने कुटुंबीयांची चिंता वाढली. नातेवाईक व ओळखीच्या व्यक्तींनी परिसरात सर्वत्र कसून शोध घेतला; तरीही शुभम सापडला नाही. अखेर त्याचे भाऊ संदीप जयस्वाल यांनी कल्याण तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रार नोंदवताच पोलीस यंत्रणा तात्काळ सक्रिय झाली. पोलीस प्रशासनाने सीसीटीव्ही फुटेजची तपासणी, संभाव्य मार्गांवर पथके तैनात करणे, रेल्वे स्थानकांवर माहिती संकलन तसेच विविध ठिकाणी चौकशी अशी सर्वंकष शोधमोहीम हाती घेतली.कल्याण तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक पंकज गिरी यांच्या नेतृत्वाखालील पथकाने सलग दीड दिवस अहोरात्र परिश्रम घेत प्रत्येक शक्य दुव्याचा मागोवा घेतला. तपासाअंती शुभम पश्चिम रेल्वे मार्गावरील बांद्रा परिसरात असल्याची माहिती काल रात्री उशिरा मिळताच पथकाने तत्काळ हालचाल करत त्याला सुरक्षित ताब्यात घेतले. शुभम सापडल्याची बातमी मिळताच कुटुंबीयांचा आनंद अनावर झाला, तर परिसरातील नागरिकांनीही पोलिसांच्या तत्परतेचे आणि समन्वयाचे कौतुक केले.

## मोरोशी आदिवासी आश्रमशाळेचे मुख्याध्यापक व अधिक्षिकांवर निलंबनाच्या कारवाईचे आदेश!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : मुरबाड तालुक्यातील मोरोशी येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक प्रल्हाद भोई आणि स्त्री अधिक्षिका जयश्री वाघाडे यांना कर्तव्यात कसूर व प्रशासकीय अनियमिततेच्या आरोपांखाली तात्काळ निलंबित करण्यात आले आहे. याबाबतचे अप्पर आयुक्त आदिवासी विभाग यांचे पत्र तहसीलदार यांनी सोशियल मीडिया मार्फत प्रसारित केले आहे.

शाळेतील मुलींच्या वसतिगृहात राहणाऱ्या कोमल भास्कर खाकर या इयत्ता दहावीमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थिनीने गळफास लावून आत्महत्या केल्याची गंभीर घटना गुरुवारी पहाटे समोर आली होती. त्यानुसार नातेवाईक व आदिवासी पक्ष संघटना यांनी आक्रमक भूमिका घेत मुख्याध्यापक व अधिक्षिका यांच्यावर कारवाईची मागणी केली होती. त्यानुसार प्रकल्प अधिकारी शहापूर दिवाकर काळपांडे यांनी आदिवासी विकास विभागाचे ठाणे येथील अप्पर आयुक्त यांना मुख्याध्यापक प्रल्हाद भोई आणि स्त्री अधिक्षिका जयश्री वाघाडे यांच्या निलंबनासाठी पत्र पाठविले होते. त्यानुसार शुक्रवारी तातडीने कारवाई होऊन अप्पर आयुक्त गोपीचंद कदम यांच्या सहीचे आदेश काढण्यात आले.

सदर आदेशात, संबंधित अधिकाऱ्यांविरोधात प्राप्त झालेल्या तक्रारींची प्राथमिक चौकशी करण्यात आली असता, सदर प्रकरणात गंभीर स्वरूपाच्या बाबी निदर्शनास आल्याने सक्षम प्राधिकरणाने ही कारवाई केल्याचे नमूद करण्यात आले आहे.

निलंबन कालावधीत संबंधित अधिकाऱ्यांनी मुख्यालयाच्या परवानगीशिवाय मुख्यालय सोडू नये, तसेच चौकशी प्रक्रियेस पूर्ण सहकार्य करावे, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. या प्रकरणी सखोल विभागीय चौकशी करण्यात येणार असून दोषी आढळल्यास पुढील कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.

या घटनेमुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व वसतिगृह व्यवस्थेवर परिणाम होऊ नये, यासाठी तात्पुरत्या स्वरूपात पर्यायी व्यवस्था करण्यात येणार असल्याचेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, या कारवाईमुळे तालुक्यातील शैक्षणिक वर्तुळात खळबळ उडाली आहे.

# भिवंडीत पालिका निवडणूकीसाठी स्वबळाचा नारा देत उमेदवारी अर्ज दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहर महानगर पालिकेच्या आगामी होणाऱ्या निवडणुकीसाठी महायुती व महाविकास आघाडी होत नसल्याने काही पक्षाच्या इच्छुक उमेदवारांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची सुरुवात केली आहे.अद्याप कोणत्याही पक्षाची युती,आघाडी व महाआघाडी न झाल्यामुळे सर्व चर्चा विफल झाल्या आहेत.त्यामुळे उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना व महाराष्ट्र नवनिर्माण सेना युती वगळता इतर पक्ष स्वबळावर निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे.

भिवंडी पालिकेची निवडणूक ही स्वबळावर लढविण्याची तयारी काँग्रेस व समाजवादी पक्षांनी सुरू केल्यामुळे दोन्ही पक्षांकडे उमेदवारी मागण्यासाठी इच्छुकांची गर्दी झाली आहे.तर शिवसेना (ठाकरे) व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने युती करून निवडणूक लढविण्याची तयारी सुरू केली आहे.तर भिवंडीत काँग्रेस व भाजप अपक्ष नगरसेवकांचे मदतीने महापौर पद भुषवणारे प्रतिभा विलास पाटील व माजी महापौर विलास पाटील हे सुध्दा कोणार्क विकास आघाडीच्यावतीने आपले उमेदवार उभे करण्याची तयारी सुरू केली असल्याने भाजप पक्ष हा कोनार्क विकास आघाडी समोर उमेदवार उभे करून मोठे आव्हान उभे करण्याची तयार सुरू केली आहे.भिवंडीत महाविकास आघाडी होणार नसल्याचे चित्र सध्या तरी स्पष्ट झालेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरद पवार) यांच्या पक्षाच्यावतीने समाजवादी पक्षाशी आघाडी करण्यासाठी प्रयत्न सुरू केले मात्र समाजवादी पक्षाने स्वबळावर निवडणूकीची तयारी सुरू करून यादी जाहीर करण्याची तयारी केल्याने शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी हतबल झाले आहेत. तर शिवसेना नेते प्रकाश पाटील व उपनेते रुपेश म्हात्रे यांनी वरिष्ठांचे आदेशानुसार भारतीय जनता पक्षासोबत महायुती करणे संदर्भात चर्चा सुरू असल्याचे सांगितले. मात्र भारतीय जनता पक्षाकडून अद्याप मुक भूमिका आहे. त्यामुळे शिवसेनेमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. भाजपचेवतीने प्रत्येक प्रभाग व वार्डात बैठका सुरू केल्या असून आपल्या वार्डामध्ये इच्छुक उमेदवारांनी तयारी सुरू करून सुरक्षितता दृष्टिकोनातून अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज सुद्धा दाखल केले आहेत.त्यामुळे भिवंडीत शिवसेना भाजप महायुती होते की नाही याबाबत प्रश्नचिन्ह कायम आहे. शिवसेना व भाजपने सध्या तरी स्वतंत्रपणे पॅनल तयार करण्याची सुरुवात केली




**भिवंडीत सध्या महाविकास आघाडी व महायुती होऊ शकत नसल्याची चर्चा सुरू झाल्याने सध्या तरी स्वबळावर निवडणूक लढविण्यासाठी तयारी सर्वच पक्षांनी तयारी सुरू केली असल्याचे सांगण्यात आले. भिवंडी महापालिकेची सार्वत्रिक निवडणूक सन 2017 मध्ये मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाली.त्यानंतर या महापालिकेवर काँग्रेस पक्षाने बहुमत मिळवत शिवसेना (ठाकरे) पक्षाशी युती करून आपला महापौर विराजमान केला होता.मात्र अडीच वर्षाच्या कालावधीनंतर काँग्रेस पक्षात मोठी फुट पडल्याने महापालिकेवर अपक्ष कोणार्क विकास आघाडीचे प्रतिभा पाटील या महापौर पदावर विराजमान झाल्या होत्या. भाजपाच्यावतीने राज्याचे वनमंत्री गणेश नाईक व माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील, आमदार महेश चौघुले, अँड.हर्षल पाटील,शिवसेना नेते प्रकाश पाटील, उपनेते रूपेश म्हात्रे, मनोज काटेकर, बाळाराम चौधरी, हे निवडणुकीची सूत्र हाताळत आहेत मात्र महायुती संदर्भात अद्याप कोणत्याही प्रकारची घोषणा केली नाही.**

### कोनार्क विकास आघाडी मैदानात

**भिवंडी पालिका कार्यक्षेत्रात 23 प्रभागात 90 वार्ड आहेत. महापालिकेत काँग्रेस 47, भाजप 19, शिवसेना 12,कोणार्क विकास आघाडी 04, आरपीआय एकतावादी 04, समाजवादी पक्ष 02,व अपक्ष 02 असे पक्षीय बलाबल आहे.**

## आर.सी.एफ.कंपनी व पंचरत्न मित्र मंडळ संयुक्त विद्यमाने वैद्यकीय शिबीर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : पंचरत्न मित्र मंडळ चेंबूर व राष्ट्रीय केमिकल अँड फर्टिलायझर लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने वाशी गाव चेंबूर येथील श्री गणेश मंदिराच्या वाशी ग्राम सभागृह वैद्यकीय शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या शिबीरात रक्तदाब, शुगर तपासणी,पी.एफ.टी.टेस्ट इत्यादी अनेक तपासण्या करून मोफत औषधे व चष्मा वाटप करण्यात आले.शिबिराचे उद्घाटन माणिक पाटील अध्यक्ष वाशी ग्राम सेवा मंडळ यांच्या हस्ते करण्यात आले.कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्रीमती नजहत शेख मॅडम संचालक वित्त आरसीएफ कंपनी, जयेंद्रदादा खुणे अध्यक्ष मुंबई प्रदेश आगरी सेना, धनंजय ठाकूर सचिव वाशी ग्रामसेवा मंडळ, संतोष शिकतोडे उप अभियंता नवी मुंबई महानगरपालिका, वसंत पाटील अध्यक्ष अनुशक्ती नगर विभाग आगरी सेना, राजेश भगत सल्लागार मुंबई आगरी सेना, लक्ष्मीकांत काटकर अध्यक्ष चेंबूर विधानसभा आगरी सेना इत्यादी मान्यवर उपस्थित होते. शिबीरासाठी डॉक्टर विनीत गायकवाड, डॉ.रजनीशकुमार व नानावटी हॉस्पिटलच्या टिमने खुप मेहनत घेतली.श्रीमती नजहत शेख मॅडम संचालक वित्त आरसीएफ कंपनी यांनी आपल्या भाषणात म्हणाल्या की, पंचरत्न मित्र मंडळाचे कार्य हे उल्लेखनीय असुन आर.सी.एफ.कंपनीच्या सहकार्याने नेहमीच समाजपयोगी स्तुत्य उपक्रम आयोजित करत असतात.त्याचा लाभ नागरिक घेत असतात. स्थानिक नागरिकांसाठी आर.सी.एफ.कंपनी नेहमीच सहकार्य करीत असते.व त्यासाठीं कटीबद्ध आहे.मंडळाच्या स्तुत्य उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.यावेळी जयेंद्र दादा खुणे व श्रीमती नजहत शेख मॅडम यांच्या हस्ते गुणवंत कामगारांचा, डॉक्टर व कार्यकर्त्यांच्या भेटवस्तू शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.शिबिर यशस्वी करण्यासाठी पंचरत्न मित्र मंडळाचे अध्यक्ष अशोक भोईर, सचिव प्रदीप गावंड, उपाध्यक्ष रमेश पाटील, खजिनदार सचिन साळुंखे, हनुमंता चव्हाण सौ.निलम गावंड, प्रकाश शेजवळ,डी.एम.मिश्रा, वैभव घरत, संदिप पाटील, सतिश कुंभार पुरुपाटसावगीकर,सौ. शितल पाटील,सौ. निता पाटील, रमाकांत गावंड, मॅथ्यू डिसूजा या कार्यकर्त्यांनी खुप परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ स्नेहा नानीवडेकर यांनी केले.




## पेण नजीक खारपाडा दुश्मी रेल्वे ट्रॅकवर मृतावस्थेत आढळला बिबट्या



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : बिबट्या आज येईल बिबट्या उद्या येईल अशी दहशत ठीक ठिकाणी निर्माण झाली होती मात्र प्रत्यक्षात कधी येईल याचा थांब पत्ता लागला नव्हता आज अखेर तो पेण तालुक्यातील दुश्मी खारपाडा दरम्यान असलेल्या रेल्वे ट्रॅक वर मृत अवस्थेत आढळला आहे . एकंदरीत पाहता असे दिसून येते आहे दृश्मी खारपाडा येथील रेल्वे ट्रॅकवर एका बिबट्याला रेल्वेने धडक दिली आणि त्या धडकेमध्ये त्याचा मृत्यू झाला आहे सदरची घटना ही रात्री घडली असल्याचे दिसून येत आहे. याबाबत निष्कर्ष काढले असता असे दिसून येत आहे की येथील ग्रामस्थांना व नागरिकांना कधीही बिबट्याच दर्शन झालं नाही मात्र आज जे दर्शन झालं ते मृता अवस्थेत झाल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे. याकडे राज्य शासनाने केंद्र शासनाने तात्काळ लक्ष द्यावे आणि या परिसरामध्ये बिबट्याचे दहशत निर्माण होणार नाही याकडे जातीने लक्ष द्यावे असे नागरिकांनी मागणी केली आहे. . खारपाडा ग्रामस्थांशी हितगुज केले असता किंवा संपर्क साधला असता त्यांनी सदर रेल्वे टेकर मृतावस्थेत बिबट्या आढळल्याचे सांगितले.

## रोहित ठाकूरचे द्रोणागिरी स्पोर्ट्समध्ये सुयश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ मोबाईल, सोशल मीडिया आणिआभासी जगात गुंतून न राहता शारीरिक तंदुरुस्ती, शिस्त आणि सातत्य यांच्या जोरावर यश संपादन करता येते, याचा जिवंत आदर्श म्हणजे रोहित यशवंत ठाकूर.

उरण तालुक्यात सध्या सुरू असलेल्या २५ व्या द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन २०२५ अंतर्गत पार पडलेल्या मेन्स फिजिकल स्पर्धेत सामान्य कुटुंबातील कु. रोहित यशवंत ठाकूर याने १४ स्पर्धकांमध्ये तिसरा क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

अवघ्या सोळा वर्षांचा रोहित, हा इयत्ता अकरावी विज्ञान शाखेत शिक्षण घेत असून, कॉलेजच्या अभ्यासासोबतच 'वशेणी हेल्थकेअर' येथील जिममध्ये नियमित सराव करत आपल्या शरीरयष्टीवर कठोर मेहनत घेत आहे. अभ्यास आणि व्यायाम यांचा समतोल साधत मिळवलेले हे यश निश्चितच कौतुकास्पद आहे.




रोहितचे वडील वशेणी गावचे यशवंत राधेश्याम ठाकूर हेही एक सामान्य कुटुंबातील व्यक्ती असून, त्यांनी मुलाच्या आवडीला पाठिंबा देत त्याच्या मेहनतीला नेहमीच प्रोत्साहन दिले. त्याच कष्टाचे आणि मार्गदर्शनाचे फळ म्हणून रोहितने ही यशस्वी झेप घेतली आहे. या स्पर्धेत सहभागी झालेल्या अनेक अनुभवी स्पर्धकांना मागे टाकत तिसऱ्या क्रमांकाचे बक्षीस पटकावणे हे रोहितच्या शिस्तबद्ध जीवनशैली, सातत्यपूर्ण सराव आणि सकारात्मक दृष्टिकोनाचे प्रतीक आहे.

आजची युवा पिढी भरकटत चालली आहे, अशी ओरड सुरू असताना रोहित सारखा युवक हे सिद्ध करतो की योग्य मार्गदर्शन, कष्ट आणि आत्मविश्वास असेल तर वय अडथळा ठरत नाही. शारीरिक तंदुरुस्ती हे केवळ स्पर्धेसाठी नव्हे, तर आरोग्यदायी आणि शिस्तबद्ध जीवनासाठी किती महत्त्वाचे आहे, हे रोहितच्या यशातून स्पष्ट होते. रोहित ठाकूरची ही यशोगाथा आजच्या तरुणांसाठी निश्चितच प्रेरणादायी असून, "मेहनत कधीही वाया जात नाही" हे पुन्हा एकदा सिद्ध करणारी आहे. त्याच्या या यशाबद्दल सर्वच ठिकाणी त्याचे अभिनंदन होत आहे.

## शेई येथील ह. भ. प. कै. गोपाळ आलो तारमळे यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : शहापूर तालुक्यातील शेई या गावातील गांधीजींच्या विचारसरणीशी एकनिष्ठ असणारे व शेई विद्यालयाचे माजी चेअरमन ह. भ. प. कै. गोपाळ आलो तारमळे यांचे वयाच्या 91 व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्या निधनाने शेई गावावर शोककळा पसरली आहे.

कै. गोपाळ तारमळे यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला असून लहानपणापासूनच त्यांनी अतिशय कष्टमय जीवन व्यथीत केले त्यांच्याकडे येणारा गोरगरीब माणूस हा कधीच रिकाम्या हाताने परतला नाही त्यांचा स्वभाव अतिशय शांत व संयमी होता आपल्या घरी आलेल्या प्रत्येकाचा मानसन्मान त्यांच्याकडून केला जात असे आपले कष्टमय जीवन जगता जगता त्यांनी आपल्या



एकत्रित कुटुंबातील पुतणे, नातू यांच्यावर योग्य संस्कार करून, चांगल्या सवयी रुजवून त्यांना योग्य त्या मार्गाला लावले. त्यांना समाजसेवेची आवड असल्यामुळे आपल्या गावाचा चांगला विकास कसा करता येईल याकडे त्यांनी सातत्याने लक्ष दिले त्यांच्या या समाज कार्यामुळे अतिशय प्रतिष्ठित व्यक्ती म्हणून गाव, समाज नातेवाईक त्यांना ओळखत होते. अशा या गांधी विचारसरणीच्या व्यक्तिमत्वाला नाना म्हणून ते सर्वांना सुपरीचीत होते सुपरीचीत होते. अशा या प्रेमळ व शांत स्वभावाच्या नानांचे शुक्रवार दिनांक 26/ 12/ 2025 रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले त्यांच्या या निधनाने शेई गावावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त होते त्यांच्या अंत्ययात्रेला वासिंद व परिसरातील नव्हे तर ठाणे जिल्ह्यातील विविध शैक्षणिक, अध्यात्मिक व राजकीय क्षेत्रातील अनेक मान्यवर व मोठा जनसमुदाय उपस्थित होता.

त्यांच्या पश्चात दोन विवाहित मुले एक विवाहित मुलगी, नातू पुतणे सुना, जावई, नात जावई, नात सुना असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी रविवार दिनांक 04/01/2026 रोजी किन्हवली येथील संगमेश्वर तीर्थक्षेत्री होणार आहेत व उत्तरकार्य विधी बुधवार दिनांक 07/01/2026 रोजी शेई येथील राहत्या घरी होणार आहेत.

## कीर्ती करंडक राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत एस.एस.टी. महाविद्यालयास दुहेरी मुकुट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कीर्ती करंडक 2025–26 राज्यस्तरीय खो-खो स्पर्धेत एस.एस.टी. महाविद्यालयाने पुरुष व महिला दोन्ही गटांत विजेतेपद पटकावत दुहेरी मुकुट आपल्या नावावर केला. दोन्ही संघांनी सादर केलेल्या उत्कृष्ट खेळामुळे महाविद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील यशात मानाचा शिरपेच रोवला गेला. या स्पर्धेत विशेष लक्ष वेधून घेतले ते महिला संघाच्या कामगिरीने. महिला संघाने सलग सहाव्यांदा विजेतेपद मिळवत आपली वर्चस्वपूर्ण परंपरा कायम राखली. संघातील खेळाडूंचे तंत्रकौशल्य, वेग, चपळाई आणि शिस्तबद्ध रणनीती यांचा प्रभावी संगम या विजयात स्पष्टपणे दिसून आला.



पुरुष व महिला दोन्ही संघांनी सामन्यांदरम्यान उत्कृष्ट समन्वय, दमदार बचाव आणि आक्रमक खेळाच्या जोरावर प्रतिस्पर्ध्यांना नमवले. या ऐतिहासिक विजयामुळे महाविद्यालयाच्या परिसरात आनंदोत्सवाचे वातावरण निर्माण झाले. स्पर्धेत सागर मोहोंडकर, अभय रत्नाकर, निकिता शिंगोळे या उत्कृष्ट खेळाडूंनी अचूक रणनीती, वेगवान धाव आणि प्रभावी डाईव्हच्या जोरावर प्रेक्षकांची विशेष दाद मिळवली असून संघाच्या विजयात त्यांचा मोलाचा वाटा ठरला. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, क्रीडा विभाग, शिक्षक,कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी संघाचे अभिनंदन करत पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा दिल्या. या संघाला प्रशिक्षक प्रताप शेलार, क्रीडा संचालक प्रा.राहूल अकुल, सहाय्यक क्रीडा संचालक प्रा.पुष्कर पवार यांनी मार्गदर्शन केले. या यशामुळे एस.एस.टी. महाविद्यालयाने राज्यस्तरीय खो-खो स्पर्धांमध्ये आपली भक्कम ओळख पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024